महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

# स्वतंत्रता दिना दिवशी तब्बल 131081 नागपूरकरांनी मेट्रोने केला प्रवास






नागपूर :- काल (१५ ऑगस्ट) मेट्रोची प्रवासी संख्या 131081 एवढी नोंद करण्यात आली. प्रवासी संख्या वाढावी या करता महा मेट्रो तर्फे सर्वंकष होणाऱ्या प्रयत्नांचेच हे फलित आहे. महा मेट्रोने मेट्रो स्थानकांवर प्रवाशांसाठी अनेक सुविधा उपलब्ध केल्या असून ज्यामध्ये महा कार्ड आणि मोबाइल ऍप इत्यादीसारख्या अनेक पाऊले महा मेट्रोने उचलली आहे.दर शनिवार आणि रविवारी महा मेट्रो मेट्रो प्रवाशांसाठी भाड्यात 30 टक्के सवलत महा मेट्रोच्या वतीने देण्यात येत असून या व्यतिरिक्त राजपत्रित सुटयांचा दिवशी देखील 30% सवलत मेट्रो प्रवाश्याना देण्यात येत आहे.

काल सर्व मेट्रो स्थानके प्रवाश्यांनि खचाखच भरली होती. रायडरशिपच्या अपेक्षे प्रमाणे महा मेट्रोने सर्व मेट्रो स्थानकांवर आवश्यक व्यवस्था केल्या होत्या. किंबहुना, गेल्या काही काळापासूनचा ट्रेंड बघता, महा मेट्रोच्या प्रवासी संख्येत सातत्याने वाढ होत आहे आणि या बाबींचा विचार करून आणि प्रवाशांच्या गर्दीचा अंदाज घेऊन, वाढलेल्या प्रवाशांना हाताळण्यासाठी महा मेट्रोने सर्व स्तरांवर अतिरिक्त कर्मचारी तैनात केले होते.

मुख्य म्हणजे, सर्व मेट्रो स्थानकांवर, विशेषत: सिताबर्डी इंटरचेंज मोठ्या प्रमाणात लांब रांग बघायला मिळाली, जिथे प्रवाशांनी सकाळपासूनच मेट्रो राइडसाठी तिकीट खरेदीसाठी रांग लावली होती.



